# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०८/२०१३** **दिनांक १७.०४.२०१३**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा बुधवार दि.१७.०४.२०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-२४६-२०१३, दिनांक १४ एप्रिल, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा बुधवार दि.१७.०४.२०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष, श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य
०३. किशोर मोरे,कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **कुपोषण व बालविकास प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३३८** श्रीमती वंदना क्रिश्ना, डायरेक्टर जनरल, राजमाता जिजाऊ मदर-चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड डेव्हलपमेंट डिपार्टमेंट, नवी मुंबई यांनी दि.०५.०४.२०१३ रोजीच्या पत्रान्वये कुपोषित बालकांसाठी संस्थानमार्फत आवश्यक ते साहित्य, खाद्यपदार्थ व फळे इत्यादी मोफत पुरविण्यासाठी कळविले आहे. उपरोक्त पत्रामध्ये दि.१३.०३.२०१३ रोजी सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी व संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी यांची यशदा, पुणे येथे झालेल्या सभेत कुपोषित बालकांसाठी व गर्भवती महिलांसाठी लागणारे खाद्यपदार्थ व साहित्य संस्थानमार्फत देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, असे सांगणेत आले होते.

त्यानुसार कुपोषण व बालविकास प्रस्तावावर चर्चा करणेसाठी आजचे सभेत मा.डॉ.पणगे-उपसंचालक (न्युट्रीशन) नवी मुंबई, मा.डॉ.खरात- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर व मा.श्री.ए.बी.पावडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद, अहमदनगर यांना चर्चा करणेसाठी निमंत्रित करणेत आले होते. त्यानुसार सदरहू विषयावर चर्चा करणेसाठी खालील मान्यवर उपस्थित होते.

(१) डॉ.राजाराम दिघे, संचालक, राजमाता जिजाऊ आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई
(२) श्री.अशोक पावडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद, अहमदनगर
(३) डॉ.विजयकुमार वाघ, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, औरंगाबाद
(४) डॉ.अविनाश आहेर, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर
(५) डॉ.वैशाली कुकडे, महा. बालविकास प्रकल्प अधिकारी, राहाता.

राजमाता जिजाऊ मदर-चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड डेव्हलपमेंट डिपार्टमेंट, नवी मुंबई यांचेमार्फत मिशनची वैशिष्टये/ भुमिका, कुपोषण निर्मुलनाची सद्यस्थिती, कुपोषण म्हणजे काय व ते मापण करण्याची पध्दत, तसेच मिशनचा प्रस्ताव/ मागणी आणि कुपोषण व बालविकास यांचे कशा प्रकारे नियोजन करणेत येत आहे, याबाबतचे सादरीकरण सभेसमोर दाखविले. सदरचे मिशन नं.१- सन २००५ ते २०१० व मिशन नं.२- सन २०११ ते २०१५ असे आहेत. यासाठी त्यांचे प्रस्तावीत असलेले नियोजनाकामी येणारा खर्च त्यांनी सोबतचे तक्त्यामध्ये दर्शविलेला आहे. त्यातील **अ** मध्ये रु. २६.२९ कोटी **ब** मध्ये रु.३.५० कोटी **क** मध्ये रु.१७.२५ कोटी असा एकुण रु.४७.०५ कोटी मात्र खर्च दर्शविलेला आहे. सदरचा प्रकल्प संपुर्ण महाराष्ट्रात कार्यान्वीत करण्याचा त्यांचा मानस आहे. याकामी त्यांनी संस्थानकडून आर्थीक मदत मिळावी अशी विनंती केली.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,**

**अ) राजमाता जिजाऊ मदर-चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड डेव्हलपमेंट डिपार्टमेंट, नवी मुंबई या संस्थेला प्रस्तावित नियोजनासाठी महाराष्ट्र शासनाकडून किती निधी मिळाला आहे व किती मिळणार आहे. वजनकाटे (लहानमुले/ प्रौढांसाठी), Stadiometer, उंचीनुसार वजनाचे तक्ते सध्या किती उपलब्ध आहेत व कितींची आवश्यकता आहे, यांची निश्चित आकडेवारी मिळावी.**

**ब) राजीव गांधी योजनेअंतर्गत होणाऱ्या ह्दय शस्त्रक्रियेस रु.१,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त खर्च येणाऱ्या रुग्णांची नेमकी संख्या किती आहे, याची आकडेवारी देण्यात यावी. ज्या**

**ठिकाणी अशा रुग्णांची संख्या जास्त आहे, अशा ठिकाणी संस्थानमार्फत शिबीर आयोजित करण्यात यावे, जेणेकरुन संस्थान आर्थिक मदत करु शकेल.**

क) **महाराष्ट्रातील गरोदर मातांची नोंदणी करणेकामी संगणकावर Software तयार करण्यात यावे. कुपोषित बालकांची संख्या कमी व्हावी याकरिता गरोदर मातांना प्रसुतीपुर्व तीन महिने अगोदरपासून बाळाची वाढ योग्य क्षमतेने होणेसाठी, योग्य प्रकारचा पुर्ण आहार देण्यात यावा. त्याचप्रमाणे नऊ महिन्यांपासून चोविस महिन्यांपर्यंतची बालके कुपोषित होऊ नये, यासाठी त्यांना पुर्ण आहार देण्यात येतो. यास अनुसरुन प्रायोगिक तत्वावर आदिवाशी व दुष्काळी भागातील एखाद्या तालुक्याची निवड करुन, तेथे अशा प्रकारचा प्रयोग करण्यात यावा. तसेच संगणकावर Software नोंदणीव्दारे तेथे किती गरोदर माता लाभार्थी होत आहे, याची आकडेवारी उपलब्ध होईल व त्याभागातील बालकांवर देखरेख ठेऊन तेथील कुपोषित बालकांची संख्या लक्षात घेऊन तेथील उणिवा व अधिकच्या उपाययोजना करणे उचित होईल. याकरीता सदरची माहिती राजमाता जिजाऊ मदर-चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्युट्रीशन मिशन वुमन ॲण्ड डेव्हलपमेंट डिपार्टमेंट, नवी मुंबई यांचेकडून मिळवुन प्रथमतः प्रायोगिक तत्वावर करण्यात येणाऱ्या तालुक्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे, यांची आकडेवारी व सविस्तर माहिती त्यांचेकडून घेण्यात यावी. सदर माहिती प्राप्त झालेनंतर सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०२** **श्री साईबाबा मंदीर व दर्शन लाईन, मंदीर परिसर पुनर्विकास प्रकल्प आराखडा याबाबत आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांचे सादरीकरण पहाणे.**

**निर्णय क्र.३३९** आजचे सभेपुढे आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांचे प्रतीनिधी आर्कि.सुमीत यांनी नियोजीत मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्पाबाबत सादरीकरण केले व समितीने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत यापुर्वी करण्यात आलेल्या सादरीकरणाचे वेळी समितीने केलेल्या सूचनांनुसार त्यांनी अद्याप आराखडे सुधारित केल्याचे दिसून आले नाही. आजचे सभेपुढे उपस्थित असलेले त्यांचे प्रतिनिधी आर्किटेक्ट सुमीत यांना यापुर्वी दिलेल्या सूचनांव्यतिरिक्त खालीलप्रमाणे सूचना करणेत आल्या.

१. मुख्य दर्शन रांग इमारतीचे नगर- मनमाड रस्त्यापासूनचे Set back distance तपासावे व त्यामध्ये प्रचलित बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार बदल करावा.

२. समाधी मंदिर दिवसभरात साधारणत : १४ तास ५० मिनिटे दर्शनासाठी खुले असते त्यानुसार आर्किटेक्ट यांनी एका दिवसात दर्शन घेणाऱ्या भाविकांच्या जास्तीत जास्त संख्येनुसार नियोजन करावे.

३. मुख्य इमारतीमध्ये प्रवेश करतेवळी किमान २५ Security Check Points असावेत.

४. नियोजीत मुख्य दर्शन रांग इमारती समोरील Security Check Area हा Covered असावा.

५. शिर्डी शहरासाठी अनुज्ञेय FSI चे संदर्भाने नियोजीत इमारतीचे क्षेत्रफळ पडताळून पहावे.

६. संपूर्ण तळघरात (Basement) मध्ये फक्त ancilliary and other services असाव्यात.

७. दर्शन रांग हॉलचे वर एक अतिरिक्त मजला (Level ३) प्रस्तावित करुन त्यामध्ये Offices and allied spaces चे नियोजन करावे.

८. दर्शन रांगेसाठी कुठेही Travellator ची आवश्यकता नसल्याने त्याचा समावेश करु नये.

वरील सुचनांनुसार नकाशात सुधारणा करुन आर्कि. हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी सुधारीत नकाशे सादर करावेत, असे ठरले. तसेच सदरहू प्रकल्पासाठी आर्किटेक्ट यांचेमार्फत आवश्यक असलेल्या सेवांचा तपशिल (Scope of Services) त्यांना कळविणेत येईल. त्यानुसार त्यांनी अपेक्षित फीचा प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा मंदीर व दर्शन लाईन, मंदीर परिसर पुनर्विकास प्रकल्प आराखडा याबाबत आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांचे सादरीकरण पहाणे.**

**निर्णय क्र.३४०** आजचे सभेपुढे आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे हे उपस्थित होते. मंदिर परिसर पूर्नविकास प्रकल्पाबाबत त्यांनी सादरीकरण केले व समितीने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. दि.०५/०९/२०१२ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालयात सादरीकरण करतेवळी त्यांना देणेत आलेल्या सुचनांनुसार सुधारणा करुन त्यांनी खालीलप्रमाणे सादरीकरण केले.

१. शुज ठेवणेसाठी येणाऱ्या साईभक्तांना शुज काढणेसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

२. शिर्डी शहरासाठी अनुज्ञेय FSI चे संदर्भाने नियोजीत इमारतीचे क्षेत्रफळ ठरविण्यात आले आहे.

३. प्रत्येक मजल्यावर एक सेंट्रल सिक्युरिटी पॉईंट असेल जेणेकरुन त्याव्दारे सर्व हॉलमधील हालचालीवर लक्ष ठेवता येईल.

४. समाधी मंदिर परिसरातील शांतीनिवास, भक्तीनिवास, सत्यनारायण व अभिषेक हॉल, इ. जुन्या इमारती काढण्यात आल्या असून देणगी कार्यालय व जनसंपर्क कार्यालय लगतच्या वास्तु तशाच ठेवण्यात आले असलेबाबत आर्किटेक्ट यांनी सभेला सांगितले.

उपरोक्त सादरीकरणावर सविस्तर चर्चा होऊन आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांना खालील बाबींचा समावेश करणेबाबत सूचना करणेत आल्या.

१. किमान २५००० साईभक्तांचे पादत्राणे ठेवणेची व्यवस्था करणेत यावी.
२. नियोजीत इमारती हया मंदिर परिसरातील इतर इमारतींप्रमाणेच पुरातन शैलीच्या असाव्यात.
३. जुने पिंपळवाडी रस्त्यावर घेणेत आलेल्या SKY WALK ऐवजी मंदिर परिसरातून दर्शन रांग असावी.
४. मुख्य दर्शन रांग इमारतीचे Queue hall मध्ये योग्य ठिकाणी नाष्टा पाकीट, बेबी फिडींग व प्रथमोपचार केंद्र असावे.
५. मुख्य दर्शन रांग इमारतीचे Basement मंदिर परिसरात असणाऱ्या विविध सुविधा उदा. लाडू काउंटर, देणगी काउंटर, कापड कोठी, उदी प्रसाद, पुस्तक विक्री इ. करीता वापरणेत यावे.
६. मंदिर परिसरात दर्शनाव्यतिरिक्त इतर कुठल्याही व्यवस्था/ सुविधा नसाव्यात.

आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांनी नकाशात वरीलप्रमाणे सुधारणा करुन मा त्रीसदस्य समितीचे सभेपुढे सादर करावेत असे ठरले. तसेच सदरहू प्रकल्पांसाठी आर्किटेक्ट यांचेमार्फत आवश्यक असलेल्या सेवांचा तपशिल (Scope of Services) त्यांना कळविणेत येईल. त्यानुसार त्यांनी अपेक्षित फीचा प्रस्ताव सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०४** **संस्थान रुग्णालयांची पहाणी व बैठक.**

**निर्णय क्र.३४१** श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रुग्णालयातील सर्व कन्सल्टंट डॉक्टरांच्या अडी अडचणी व काम काजाबाबत चर्चा करणेत आली. सदरहू सभेस दोन्ही रुग्णालयातील सर्व डॉक्टर उपस्थित होते.

**१)** सभेच्या सुरुवातीस मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी उपस्थित डॉक्टरांना दोन्ही रुग्णालयासाठी उपलब्ध असलेल्या औषधांबाबत सर्वांचे मत जाणुन घेतले.

**२)** त्यावेळेस डॉ. गगन शर्मा, फिजीशियन यांनी सध्या उपलब्ध असलेली जनरीक औषधे ही नामांकीत कंपनीचे आहे. परंतु त्याचा रुग्णांवर अजीबात रिझल्ट येत नाही. अशाच प्रकारची तक्रार डॉ. सुरवासे, भुलतज्ञ यांनी भुलीसाठी वापरावयाचे इंजेक्शन बाबत तक्रार केली. डॉ. मेहेरोत्रा फिजीशियन यांनी बऱ्याच रुग्णांना औषधांचा डोस हा एकत्रीत (Combination) मध्ये दिल्यास रुग्णास कमीत कमी गोळया घ्याव्या लागतात. (उदा. डायबेटीस, ब्लड प्रेशर, किडणी इ.) परंतु जनरीक मेडीसीन मध्ये अशी औषधे बहुतेक कंपन्याची उपलब्ध नाही. त्यामुळे प्रत्येक औषधे वेगवेगळी लिहून दयावी लागतात व लिहून देणेस बराच वेळ खर्च होईल. कारण रुग्णांची गर्दी देखील खुप असते. शिवाय औषधांची संख्या वाढल्यामुळे रुग्णांची गोळया घेण्याची मानसिकता होणार नाही. डॉ बजाज कार्डीओलॉजिस्ट यांनी Inj. Heparin ची वापर करतांना अडचण आली होती परंतु कंपनीस कळवल्यानंतर त्यानी Lot बदलून दिला व सध्या काही तक्रार नाही. महत्वाचे Antibiotic (Life Saving Drugs) ही Branded कंपनीचीच असावी व Supporting Drug (e.g. Analgesic, Anti Allergic, Vitamins Antacid etc.) औषधे जनरीक मध्ये ठेवण्यास हरकत नाही. डॉ. बजाज यांचे मताशी उपस्थित सर्वच डॉक्टरांनी दूजोरा दिला.

यानंतर वैद्यकीय संचालक यांनी ज्या ज्या औषधांच्या बद्दल डॉक्टरांनी तक्रार केल्या त्यासाठी संबंधीत कंपनीस कळवून त्यांचे प्रतिनिधी रुग्णालयात समक्ष येऊन संबंधीत डॉक्टरांना भेटुन येणाऱ्या अडचणीचे शंका निरसन केलेले आहे. मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी ज्या ज्या औषधांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहे. त्या औषधांचे नमुने प्रयोग शाळेमध्ये पाठवून त्याचा तपासणी अहवाल लवकरात लवकर घेऊन व संबंधीत कंपनी प्रतिनिधी, डॉक्टर यांची सभा लवकरात लवकर घेण्यात यावी असे सुचविले. तसेच अपोलो फार्मसीमध्ये Supporting Drugs नामांकित कंपनीचे जनरीक मध्ये ठेवण्यात यावे असे सुचविले. दरम्यानच्या काळात स्वतंत्र जनरीक फार्मसी सुरु करणेकामी फार्मासिस्ट असोसिएशनशी चर्चा करावी असे ठरले.

**३)** दोन्ही रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना दयावयाचे युनीफॉर्म (गणवेश) बाबत मा. कार्यकारी अधिकारी व उप कार्यकारी अधिकारी यांनी दि.३०/०३/२०१३ रोजी रेमण्ड कंपनीचे अहमदनगर येथील शोरुममध्ये पसंत केलेल्या कापडाचे नमुनेप्रमाणे कापड खरेदीसाठी रेमण्ड कंपनीचे कोटेशन (दरपत्रक) घेऊन त्यासाठी येणाऱ्या खर्चास मा. त्रिसदस्य समिती सभेत मान्यता घेऊन कापड खरेदी करावे व शिलाईसाठी वेगळे कोटेशन लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी.

**४)** डॉ. नरोडे इंटेंसिव्हीस्ट यांनी असे मत मांडले की, सध्या श्री साईबाबा रुग्णालयात ४ आय.सी.सी.यु असुन येथे ५० खाटा आहे. सर्व हे शस्त्रक्रियानंतरचे रुग्ण विशेषतः कार्डीयाक व

कार्डीओलॉजी तर आय.सी.सी.यु / जी.आय.सी.यु मध्ये इतर अत्यावस्थ रुग्णांची कायम गर्दी असते. बऱ्याच वेळा रुग्णांना जागा उपलब्ध नसते. परंतु या सर्व आय.सी.सी.यु मध्ये नर्सींग केअर देण्यासाठी परिचारिकांची संख्या खुप कमी आहे. त्यामुळे रुग्णांना व्यवस्थित सेवा देण्यास अडचणी येतात. डॉ. शर्मा फिजिशीयन यांनी सध्या रुग्णालयात बाह्य रुग्ण व अंतररुग्णांची सतत गर्दी असते. सर्व वॉर्ड हे नेहमी भरलेले असतात. परंतु वॉर्डमध्ये आर.एम.ओ यांची संख्या देखील खुप कमी आहे. त्यामुळे रुग्णांना वेळेत उपचार करणे / डिसचार्ज कार्ड भरणे / डिसचार्ज व ॲडमिट संबंधीत प्रक्रिया पुर्ण करणे उपचार त्वरीत चालू करणे इत्यादीबाबत अडचणी येतात.

यावर वैद्यकीय संचालक यांनी सध्या श्री साईबाबा रुग्णालयात ४० तर श्री साईनाथ रुग्णालयात आर.एम. ओंची १६ पदे मंजुर आहे तर सी.एम.ओंची प्रत्येकी ६ पदे मंजुर आहे. सदर आर.एम.ओ हे एम.बी.बी. एस शैक्षणिक अर्हता असलेली असतात. परंतु सर्व आर.एम.ओ हे नवीन एम.बी.बी.एस परिक्षा पास होऊन आलेले असतात व ते नंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी (Post Graduation) नंबर लागल्यास मध्येच सोडुन जातात तसेच संस्थान रुग्णालय हे ग्रामीण भागात असल्याने बाहेरील डॉक्टर हे येण्यास इच्छुक नसतात त्यामुळे वारंवार या पदांसाठी जाहिरात दयावी लागते जाहिरातीस देखील खुपच कमी प्रतिसाद मिळतो.

पर्यायाने जाहिरातीवर संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होतो. यावर पर्याय म्हणून बी.ए.एम.एस पदवीधारक डॉक्टर घेतल्यास बऱ्यापैकी अडचणी कमी होण्यास मदत होईल कारण बी.ए.एम.एस डॉक्टर हे उपलब्ध देखील होतील व तसेच मध्येच नोकरी सोडुन जाण्याची शक्यता कमी राहील. त्यामुळे अडचणी दुर होण्यास बऱ्यापैकी मदत होईल. परंतु संस्थानचे आस्थापनेवरील आकृतीबंधात आर.एम.ओ हया पदाची शैक्षणिक पात्रता एम.बी.बी.एस अशी ठरवलेली आहे. तेव्हा यासाठी आकृतीबंधात शैक्षणिक पात्रता देखील बदल करावा लागेल तेव्हा बी.ए.एम.एस डॉक्टर याची कशा प्रकारे पदस्थापना व वेतन देता येईल (e.g. Clinical Assitant, Assitant to RMO House Officer) याबाबत वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय संचालक यांनी अभ्यास करुन मा. त्रिसदस्य समिती पुढे प्रस्ताव सादर करावा.

तसेच सध्या दोन्ही रुग्णालयात मिळून परिचारिकांची ८० पदे तर इतर मेडीकल / पॅरामेडीकल कर्मचारी रिक्त असून ती भरणेसाठी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे असे वैद्यकीय संचालक यांनी सभेपुढे सांगितले याकामी लवकरात लवकर पाठपुरावा करुन पद भरणेची प्रक्रिया पुर्ण करावीत असे निर्देश देण्यात आले.

**५)** डॉ. नरोडे इन्टेंसिव्हीस्ट यांनी सध्या रुग्णालयात ४ आय.सी.सी.यु आहे व त्याप्रमाणात शिफ्ट डयुटी प्रमाणे इन्टेंसिव्हीस्ट सध्या आपणाकडे उपलब्ध नाही. कारण इन्टेंसिव्हीस्ट यांना बाहेरील रुग्णालयात जास्त Incentive मिळतो. त्यामुळे उपलब्ध इन्टेंसिव्हीस्टवर कामाचा बोजा पडतो.

यावर वैद्यकीय संचालक यांनी सध्या एकुण ३ सिनिअर व ६ ज्यूनिअर इन्टेंसिव्हीस्टची पदे मंजुर आहेत पैकी १ सिनिअर व १ ज्यूनिअर पदे भरलेली आहेत. परंतु सदर पदावर वेळोवेळी जाहिरात देऊन देखील उमेदवार मिळत नाही. तसेच संस्थानचे रुग्णालय ग्रामीण भागात असल्यामुळे बरेच वेळा डॉक्टर येण्यास इच्छुक नसतात. यावर चर्चा होऊन वैद्यकीय संचालक यांनी संस्थानचे रुग्णालयात व बाहेरील रुग्णालयात किती ? व कशा पध्दतीने वेतन व इन्सेंटिव्ह दिला जातो याबाबत माहिती घेऊन पुढील सभेपुढे सादर करावी म्हणजे यावर विचार करुन निर्णय घेता येईल.

**६)** राजीव गांधी योजना सध्या श्री साईबाबा रुग्णालयात कार्यान्वित करणेत आलेली आहे व सदर योजने अंतर्गत रुग्णांना बाहेरुन औषधे लिहून देण्यास परवानगी नाही त्यामुळे उपलब्ध असलेल्या औषधांपैकी औषधे कमी पडतात. तेव्हा जी औषधे आपल्याकडे उपलब्ध नाही त्यातील वैद्यकीय संचालक यांनी आवश्यक असतील ती औषधे (स्थानिक दुकानदारांकडुन) खरेदी करुन देण्यात यावी तसेच वार्षीक खरेदीमध्ये देखील समावेश करण्यात यावा.

**७)** श्री साईनाथ रुग्णालयाचे सर्व कन्सल्टंट डॉक्टरांनी त्यांना श्री साईबाबा रुग्णालयाचे डॉक्टरांप्रमाणे Incentive मिळत नाही व आमची मागणी बऱ्याच दिवसापासून प्रलंबीत आहे. आम्हाला देखील श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टराप्रमाणे Incentive मिळावा अशी विनंती केली. यावर चर्चा होऊन याबाबत सविस्तर अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल असे ठरले.

**८)** औषध भांडार विभागात उपलब्ध असलेल्या औषधांबाबत काही तक्रार असल्यास ती प्रथम वैद्यकिय संचालक / अधिक्षक यांचेकडे लिखित स्वरुपात सादर करावी. वैद्यकिय संचालक / अधिक्षक यांनी सदर तक्रारीची शहानिशा करुन पुढील कार्यवाहीसाठी खरेदी विभागाकडे आदेश पारीत करावे.

**९)** नेत्रशल्य चिकित्सा विभागाकरीता लागणारी लेन्सेस चांगल्या दर्जाची खरेदी करण्यात यावीत, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **शिर्डी ग्रामस्थ यांचा श्री रामनवमी उत्सव- २०१३ मध्ये कुस्त्या, तमाशा व टांगा शर्यती करीताचे खर्चाची रक्कम संस्थानकडून मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांनी शिरडीत सुरु केलेल्या रामनवमी उत्सवात प्रथापरंपरेप्रमाणे चालू वर्षी कुस्त्यांचा हंगामा मोठया प्रमाणात आयोजीत करावा असे शिर्डी नगरपंचायत व शिर्डी ग्रामस्थ यांच्या वतीने ठरले आहे.

यानुसार खालीलप्रमाणे कुस्त्यांचे नियोजन करण्यात आलेले आहे.

| **साईकेसरी** | | | | विजेता | उपविजेता |
|---|---|---|---|---|---|
| १) | चंद्रहार पाटील ( महाराष्ट्र केसरी ) | x | कुलदीप सिंग (दिल्ली केसरी) | ५०,०००/- | ३०,०००/- |
| **उपसाईकेसरी** | | | | | |
| २) | मच्छिंद्र जपे ( ठाणे महापौर वसाई केसरी ) | x | राकेश कुमार (राष्ट्रीय विजेता) | ४०,०००/- | २०,०००/- |
| ३) | अमित गाडे (जिल्हा केसरी ) | x | योगेश दरेकर (जिल्हा केसरी, मालेगांव ) | २०,०००/- | १५,०००/- |
| ४) | विलास डोईफोडे ( महाराष्ट्र चॅम्पीयन ) | x | प्रताप गायकवाड (उत्तर महाराष्ट्र केसरी, अहमदनगर) | २०,०००/- | १५,०००/- |
| ५) | कमलेश सांगळे (महाराष्ट्र चॅम्पीअन, आ.संजय पवार पठ्ठा ) | x | गणेश शेळके (कर्जत) | १५,०००/- | १०,०००/- |
| ६) | गोकुळ कानडे (जिल्हा केसरी, येवला ) | x | अनिल ब्राम्हणे (कुमार केसरी, ब्राम्हणी ) | १०,०००/- | १०,०००/- |
| ७) | विश्वंभर खैरे ( जंगली महाराज कुस्ती केंद्र ) | x | इम्रान खान (मालेगांव) | १०,०००/- | ७,०००/- |
| ८) | संदिप लांडे ( जंगली महाराज कुस्ती केंद्र ) | x | प्रताप ढोकणे (नाशिक) | ७,०००/- | ५,०००/- |
| ९) | संभाजी भवर ( ब्राम्हणी ) | x | शरद धात्रक (महाराष्ट्र पोलीस, नाशिक ) | ५,०००/- | ३,०००/- |
| १०) | मंगेश मुर्तडक ( कोऱ्हाळे ) | x | सुनिल खपके (राहुरी ) | ५,०००/- | ३०००/- |

| | | |
|---|---|---|
| उपरोक्त कुस्त्यांकरीता एकुण मानधन | :- रु | २,९०,०००/- |
| इतर कुस्त्यांकरीता | :- रु | १,५०,०००/- |
| कुस्ती निवेदक मानधन | :- रु | १५,०००/- |
| हलगी वादक मानधन | :- रु | १०,०००/- |
| प्रचार प्रसिध्दी ( डिजीटल बोर्ड,पत्रके, रिक्षा अनाऊसंमेट पंच मानधन | :- रु | २०,०००/- |
| पंच मानधन | :- रु | ६,०००/- |
| वरीलप्रमाणे कुस्त्यांकरीता एकुण खर्च | :- रु | ४,९१,०००/- |

याशिवाय यात्रा कालावधीमध्ये श्री समोर तमाशा कलाकारांची हजेरी होत असते. येत्या रामनवमी उत्सवात लोककलेला प्रोत्साहन देणेकरीता सदरचे तमाशे मोफत आयोजीत करण्यात येणार आहे. या तमाशा कलाकारांना मानधन म्हणून रु.२,००,०००/- लाख रुपये दयावे लागणार आहे. तसेच टांगा शर्यती आयोजीत करण्यात येणार आहे. सदर शर्यतीसाठी रु.२,००,०००/- दयावे लागणार आहे.

श्री रामनवमी उत्सव २०१३ करीता कुस्त्या, तमाशा व टांगा शर्यत आयोजनाकरीता शिर्डी ग्रामस्थांनी खर्च रु.८,९१,०००/- संस्थान मार्फत करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

मागील वर्षी शिर्डी ग्रामस्थांनी रककम रुपये ६,७५,०००/- (सहा लाख पच्यांहत्तर हजार) मात्रची मागणी केली होती. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०३/२०१२ चे सभेतील चर्चेनुसार त्यांना कुस्त्या हगामाकरीता संस्थानतर्फे पहिलवान, निवेदक, हलकी वादक, पंच इ.मानधन तसेच प्रचार प्रसिध्दी या सर्व खर्चासह रक्कम रुपये ३ लाख मंजुर करण्यात आलेले आहेत. श्री रामनवमी उत्सव २०१३ च्या अंदाजीत खर्चात कुस्त्या हगामाकरीता रु.३ लाखाची तरतुद आहे.

निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०१३ करीता प्रथापरंपरेप्रमाणे चालू वर्षी कुस्त्यांच्या हगामाकरीता पहिलवान, निवेदक, हलकी वादक, पंच इ.मानधन तसेच प्रचार प्रसिध्दी या सर्व समावेशक खर्चासाठी संस्थानतर्फे रुपये ४,००,०००/- मात्र रक्कम देण्यात यावी. तसेच, सदरची रक्कम तातडीने आदा करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन-वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **श्री साईबाबा रुग्णालयातील सन २०१२-१३ या वर्षातील On Consignment Basis वरील Stent चे नविन दराबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयासाठी सन २०१२-१३ या वर्षाकरिता लागणाऱ्या वार्षिक औषधे/ सर्जिकल साहित्य/ On Consignment Basis वरील साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. ४०,५५,५६,३८८/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.०६/०४/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरहू सभेत On Consignment Basis वरील साहित्य खरेदीकामी अंदाजे एकुण रक्कम रु. १५,००,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात यावे व संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात यावी, असे ठरले होते.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी विहीत वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या सदरहू निविदा धारकांनी देऊ केलेल्या मुळ दरात अजुन सुट मिळणेकामी दि.२८/०८/२०१२ रोजी तज्ञ सल्लागार सिव्हील सर्जन, जिल्हा आरोग्य अधिकारी व वैद्यकीय संचालक, वैद्यकीय प्रशासक यांचे उपस्थितीत चर्चा वाटाघाटी करुन दरात सुट घेण्यात आली होती.

त्यानुसार प्राप्त झालेल्या दरानुसार व वापरणारे कार्डीओलॉजीस्ट यांनी सुचविल्याप्रमाणे व मागील वर्षी केंद्रशासनाने (CGHS) Central Government Health Services रुग्णांकरिता दि.३१/१०/२०११ चे परिपत्रकातील Stent चे व वेगवेगळया प्रकारानुसार त्यांनी मंजुर केलेल्या रक्कमे पर्यंत किवा त्यापेक्षा कमी दर प्राप्त झालेले असेल तर त्यानुसार निवड करुन सन २०१२-१३ चे वार्षीक खरेदीकामी दि.२६/११/२०१३ रोजी On Consignment Basis वर जीवनदायी रुग्णांसाठी ठेवणेकामी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No | Specification / Description Offered in Tender | Approval | Make | Brand Name | Gauge / Length / strength / Pack Size if any Etc - (Quantity per Set) | Rate per in Rs. | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| a) | *STENTS* | | | | | | |
| 1 | **BARE METAL STENT (ALL SIZE)** | | | | | | |
| | | CE | Relisys Medical Devices Limited | Legend V & Legend Mini | Dia - 2.5,2.75,3.0,3.5<br>Length - 10,13,15,18,20,24,28,32 | 9450.00 | Jeevandai / Payment |
| | | US FDA | Boston Scientific | Liberté ™ | Length 8mm,12mm,16mm, 20mm,24mm,28mm | 12000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Eucatech, Germany | Prolink Lp/Sv | 2.00 x 10,15,20,25,30MM<br>2.25 x 10,15,20,25,30MM<br>2.50 x 10,15,20,25,30MM<br>2.75 x 10,15,20,25,30MM<br>3.00 x 10,15,20,25,30MM<br>3.25 x 10,15,20,25,30MM<br>3.50 x 10,15,20,25,30MM<br>4.00 x 10,15,20,25,30MM | 12000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Merrile Lifesciences | Crypton | 2.50x8,13,16,19,24,29,32,37,40 MM<br>2.75 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM<br>3.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM<br>3.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM<br>4.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM<br>4.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM | 13000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE / FDA | Abbott | Zeta | 2.75 X 8,13,15,18,23,28MM<br>3.00 X 8,13,15,18,23,28,33,38MM<br>3.50 X 8,13,15,18,23,28,33,38MM<br>4.00 X 8,13,15,18,23,28,33,38MM | 14850.00 | Jeevandai / Payment |

| Sr. No | Specification / Description Offered in Tender | Approval | Make | Brand Name | Gauge / Length / strength / Pack Size if any Etc - (Quantity per Set) | Rate per in Rs. | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | CE | Sahajanand Medical Technologies | Matrix | Diameter:2.5/2.75/3.0/3.5/4.0mm Lengths:11,16,19,23,29,33&39 mm | 16000.00 | Jeevandai / Payment |
| | | | | | | | |
| 3 | DRUG COATING STENT(ALL SIZE) | | | | | | |
| | | DCGI | Envision Scientific Pvt Ltd | Nostrum | 2.25 X 8,12,16,20,24,28,32,36,40MM 2.50 X 8,12,16,20,24,28,32,36,40MM 2.75 X 8,12,16,20,24,28,32,36,40MM 3.00 X 8,12,16,20,24,28,32,36,40MM 3.50 X 8,12,16,20,24,28,32,36MM | 37000.00 | Jeevandai / Payment |
| | | DCGI | Vascular Solitions | Eliminat-R | 2.50 X 8,12,16,20,24,28,32,36,40MM 2.75 X 8,12,16,20,24,28,32,36,40MM 3.00 X 8,12,16,20,24,28,32,36,40MM 3.50 X 8,12,16,20,24,28,32,36,40MM 4.00 X 8,12,16,20,24,28,32,36,40MM | 38000.00 | Jeevandai / Payment |
| | | DCGI | Envision Scientific Pvt Ltd | Abluminius | 2.25 x 8,12,16,20,24,28,32,36,40MM 2.50 x 8,12,16,20,24,28,32,36,40MM 2.75 x 8,12,16,20,24,28,32,36,40MM 3.00 x 8,12,16,20,24,28,32,36,40MM 3.50 x 8,12,16,20,24,28,32,36 MM | 39000.00 | Jeevandai / Payment |
| | | DCGI | Eucatech, Germany | Pronova | 2.50 x 13,18,23,28,33,38MM 2.75 x 13,18,23,28,33,38MM 3.00 x 13,18,23,28,33,38MM 3.50 x 13,18,23,28,33,38MM | 40000.00 | Jeevandai / Payment |
| | | DCGI | Miv Therapeutics India Pvt | Genxsync | 2.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 2.75 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 3.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 3.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 4.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM | 40000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Merrilelifesciences | Biomime/Biomime Aura | 2.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 2.75 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 3.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 3.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 4.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 4.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM | 40000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Translimina Therapeutics Llp | Yuckon Choice Pc | 2.00 x 8,12,16,18,21,24,28,32 MM 2.25 x 8,12,16,18,21,24,28,32 MM 2.50 x 8,12,16,18,21,24,28,32 MM 2.75 x 8,12,16,18,21,24,28,32,40 MM 3.00 x 8,12,16,18,21,24,28,32,40 MM 3.50 x 8,12,16,18,21,24,28,32,40 MM 4.00 x 8,12,16,18,21,24,28,32,40 MM | 40000.00 | Jeevandai / Payment |

| Sr. No | Specification / Description Offered in Tender | Approval | Make | Brand Name | Gauge / Length / strength / Pack Size if any Etc - (Quantity per Set) | Rate per in Rs. | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | CE | Sahajanand Medical Technologies | Supralimus Core | Diameter:2.5/ 2.75/ 3.0/ 3.5 mm Lengths: 08,12,16,20,24, 28,32,36 & 40 mm | 40000.00 | Jeevandai / Payment |
| | | | | | | | |
| 4 | COBALT CHROMIUM STENT (ALL SIZE) | | | | | | |
| | | CE | Relisys Medical Devices Limited | Cobal+C & Cobal+C Mini | Dia - 2.5,2.75,3.0,3.5,4.0 Length - 10,13,15,18,20,24,28,32 | 11550.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Insightra Medical Usa | Patriot | 2.25X9/12/15/20/25 2.5X9/12/15/20/25 2.75X9/12/15/20/25 3.0X12/15/20/25/30/40 3.5/12/15/20/25/30/40 4.0X12/15/20/25 | 17000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Merrilelifesciences | Nexgen | 2.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 2.75 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 3.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 3.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 4.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 4.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM | 17000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Biotronik | Prokinetic Probio Coating | 2.0X8/10/13/15/18/20 2.25X8/10/13/15/18/20 2.5X8/10/13/15/18/20/22 2.75X8/10/13/15/18/20/22 3.0X8/10/13/15/18/20/22/25/30 3.5/8/10/13/15/18/20/22/25/30 4.0X8/10/13/15/18/20/22/25/30 | 17500.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Minivasys | Amazonia Croco Cobalt Chromium Stent System | 2.50 x 12,16,20,24, 28,32,36, 40MM 2.75 x 12,16,20,24,28,32,36,40MM 3.00 x 12,16,20,24,28,32,36,40MM 3.50 x 12,16,20,24,28,32,36,40MM | 18000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Miv Therapeutics India Pvt | Genxcrco | 2.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 2.75 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 3.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 3.50 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM 4.00 x 8,13,16,19,24,29,32,37,40MM | 18000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Eucatech,Germany | Prozeta | 2.25 x 13,18,23MM2.50 x 13,18,23,28,33,38MM2.75 x 13,18,23,28,33,38MM3.00 x 13,18,23,28,33,38MM3.50 x 13,18,23,28,33,38MM4.00 x 13,18,23,28,33,38MM | 18000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Sahajanand Medical Technologies | Coronnium | Diameter:2.5/ 2.75/ 3.0/ 3.5 mm Lengths: 08,12,16,20,24,28,32,36&40mm | 18000.00 | Jeevandai / Payment |
| 5 | RENAL STENT (ALL SIZE) | | | | | | |
| | | CE | Eucatech, Germany | Prostar | 4.00 x 13,18,23,28,33,38MM 5.00 x 13,18,23,28,33,38MM 6.00 x 13,18,23,28,33,38MM 7.00 x 13,18,23,28,33,38MM 8.00 x 13,18,23,28,33,38MM | 20000.00 | Jeevandai / Payment |
| | | US FDA | Biotronik | Dynamic Probio Coating | 5.0 X 12/15/19 6.0 X 12/15/19 7.0 X 12/15/19 | 28000.00 | Jeevandai / Payment |
| | | US FDA | Abbott | Herculink | 5.00 X 12,15,18MM 6.00 X 12,15,18MM 7.00 X 15,18MM | 31000.00 | Jeevandai / Payment |
| | | | | | | | |

| Sr. No | Specification / Description Offered in Tender | Approval | Make | Brand Name | Gauge / Length / strength / Pack Size if any Etc - (Quantity per Set) | Rate per in Rs. | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | PERIPHERAL ANGIOPLASTY STENT (ALL SIZE) | | | | | | |
| | | CE | Eucatech,Germany | Prostar | 4.00 x 13,18,23,28,33,38MM<br>5.00 x 13,18,23,28,33,38MM<br>6.00 x 13,18,23,28,33,38MM<br>7.00 x 13,18,23,28,33,38MM<br>8.00 x 13,18,23,28,33,38MM | 20000.00 | Jeevandai / Payment |
| | | US FDA | Boston Scientific | Express Ld | 6F/7F sheath compatibility. 135/120 cm usable length | 32500.00 | Jeevandai / Payment |
| | | | Medtronic | Complete SE | Size:4.0,5.0,6.0,7.0,8.0,9.0,10 mm Length:20,30,40,60,80,100,120 ,150mm | 35000.00 | Jeevandai / Payment |
| | | | Medtronic | Scuba | Size : 5.0, 6.0, 7.0, 8.0, 9.0, 10.0mm Length:18, 30, 37, 55, 75mm | 35000.00 | Jeevandai / Payment |
| | | | Medtronic | Assurant Cobalt | Size : 6.0,7.0,8.0,9.0,10 mm Length : 20,30,40,60 mm | 35000.00 | Jeevandai / Payment |
| | | CE | Boston Scientific | Epic | | 38000.00 | Jeevandai / Payment |
| | | | Eucatech, Germany | Resistent | ALL SIZES | 40000.00 | Jeevandai / Payment |
| | | | Medtronic | Maris Plus | Size : 6.0 - 7.0 - 8.0 - 9.0 - 10.0 - 12.0mm Length : 30, 40, 60, 80, 100, 120, 150mm | 40000.00 | Jeevandai / Payment |
| | | | Medtronic | Chromis Deep | Size : 2.0, 2.5, 3.0, 3.5, 4.0 mm Length:10, 18, 38, 57, 76 mm | 40000.00 | Jeevandai / Payment |

परंतु केंद्र शासनाचे CGHS चे रुग्णांकरिता पुन्हा दि. २१/०२/२०१३ चे परिपत्रकान्वये तीन प्रकारचे Stent १) Drug Eluting Coronary Stents, २) Bare Metal Coronary Stents ३) Bare Metal Stainless Steel Stent याकरिता खालील प्रमाणे दर कमी केलेले आहे.

| Sr. No. | Type of Coronary Stents | | Ceiling Rate |
|---|---|---|---|
| 1. | Drug Eluting Coronary Stents | All DCGI and FDA approved Drug Eluting Stents<br>All DCGI and CE approved Drug Eluting Stents<br>All DCGI approved Drug Eluting Stents | Rs.25000/- |
| 2. | Bare Metal Coronary Stents | Cobalt Stents (including Coated and other Stents)<br>All DCGI and FDA approved<br>All DCGI and CE approved<br>All DCGI approved | Rs.12000/- |
| 3. | Bare Metal Stainless Steel Stent | Rs.10000/- the rates were already notified vide OM of even number dated 7th February 2013. | |

त्यानुसार इकडील पत्र क्र. ९१४५ ते ९१५९ चे पत्रान्वये सर्व १५ पुरवठाधारकांना पत्र पाठवुन केंद्र शासनाने CGHS चे कमी केलेल्या दरानुसार आपण संस्थानला देखील कमी करुन दयावे असे कळविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Shivam Trading Company, Mumbai यांनी त्यांचेकडील On Consignment Basis वर असलेले Bare Metal Stent व Cobalt Chromium Stent चे दर कमी करुन दिले आहे तर M/s. Palmaz Blue Technologies, Pune त्यांचे Drug Eluting Stent चे दर रु.२५०००/- करुन दिलेले आहे.

उर्वरित १३ पुरवठाधारकांना पत्र दिल्यानंतर वेळोवेळी दुरध्वनी वरुन तगादा करण्यात आला त्यापैकी तीन पुरवठाधारक १) M/s. Advance Vascular Technologies, Mumbai २) M/s. Vascular Concepts Ltd., Mumbai ३) M/s. Sahajanand Medical Technologies Pvt. Ltd., Mumbai इत्यादी पुरवठाधारक शिर्डी येथे समक्ष येऊन गेले व त्यांनी आम्ही शासनाचे जीवनदायी योजनेअंतर्गत असणाऱ्या रुग्णांसाठी Stent चे दर करार (Rate Contract ) केलेले आहे, शासनाकडून जेव्हा नवीन दरात बदल होतील व ज्या तारखेपासुन परीपत्रक निघेल त्या तारखेपासुन आम्ही संस्थानला दर कमी करुन फरकाची रक्कम देखील शासनाचे परिपत्रकाचे तारखेपासुन संस्थानला देऊ. ज्या पुरवठाधारकांनी अजुन दर कमी करुन दिलेले नाही असे उर्वरीत १३ पुरवठाधारकांना आजचे सभेपुढे समक्ष बोलविण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त १३ पुरवठाधारकांशी चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कंपन्यांनी चर्चा वाटाघाटीत दर कमी केले तरी स्टेंट हॉस्पिटलमध्ये पोहोच करणेसाठी अनेक वेळा येणे-जाणे करावे लागते, यामुळे कंपन्यांना जास्त खर्च येतो. यासाठी पर्याय म्हणुन सध्या वापरत असलेल्या सर्व स्टेंटस्धारकांचे स्टेंट साधरणतः ५% पर्यतच्या फरकाने कार्डीयालॉजीस्ट समान वापर करत असतील, तर सर्व पुरवठाधारक स्टेंटचे दर कमी करुन देण्यास तयार आहेत, अशी माहिती पुरवठाधारकांनी दिली. यावर कार्डीयालॉजीस्ट यांचेबरोबर समक्ष चर्चा करुन सध्या वापरत असलेल्या पुरवठाधारकांचे स्टेंटस् समान वापरण्यात येतील, असे सांगीतले. प्रसंगी माहे डिसेंबर २०१२ ते मार्च २०१३ कालावधीतील स्टेन्ट वापराचा तक्ता सर्वांना पुरविण्यात आला. चर्चा वाटाघाटीअंती या पुरवठाधारकांचे स्टेंटस् साधरणतः ५% पर्यतच्या फरकाने वापरण्यात यावे, याबाबत वैद्यकिय संचालक यांनी त्रैमासिक आढावा घेऊन नियंत्रण ठेवावे व CGHS Circular/ २१.०२.२०१३ मध्ये नमुद केलेले सर्व करांसहीत दर रु.२५,०००/-, १२,०००/-, १०,०००/- हे दि.१८/०४/२०१३ पासुन लागु करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

वरील निर्णय क्र. ३३८ ते ३४३ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी